महाराष्ट्र राज्य क्रीडा परिषदेच्या निधीतून स्पर्धा आयोजनाकरिता आर्थिक सहाय्य करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांक : राक्रीप २०१८/प्र.क्र.६३/क्रीयुसे -३
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
तारीख : २८ मार्च, २०१८.

वाचा:-

१) समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग शासन निर्णय क्र.राक्रीधो १०९६/प्र.क्र.३३०/क्रीयुसे-१ दि. ३१/७/१९९७.
२) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय क्र. राक्रीप-१३११/प्र.क्र.७०/क्रीयुसे-३ दि. ४/७/२०१२.
३) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय क्र. बैठक ३४१७/प्र.क्र.८५/क्रीयुसे-२ दि. २/२/१८.

प्रस्तावना :-

राज्यातील क्रीडा व खेळाच्या विकासासाठी विविध स्तरावर कार्यरत असलेल्या नोंदणीकृत संस्था/संघटनांना संदर्भाधिन क्र. १ येथे नमूद केलेल्या शासन निर्णयातील नियम क्र. ११,१२,व १३ अन्वये, शासनातर्फे महाराष्ट्र राज्य क्रीडा परिषदेच्या निधीतून अधिकृत राज्य/राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय स्पर्धा आयोजनाकरिता आर्थिक सहाय्य देण्यांत येते. सन २०१७-१८ या वर्षात प्राप्त झालेल्या ६ नोंदणीकृत संस्थांना परिशिष्ट -अ मध्ये नमूद केल्याप्रमाणे स्पर्धेच्या आयोजनाकरीता निधी वितरीत करण्याची बाब या नस्तीवर विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

सन २०१७-१८ या वर्षात क्रीडा व युवक सेवा संचालनालयाकडे प्राप्त झालेल्या एकूण ६ प्रस्तावांना अधिकृत राज्य/राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय स्पर्धा आयोजनाकरिता परिशिष्ट-अ मध्ये नमूद केल्याप्रमाणे रु. ६.०० लक्ष (अक्षरी रुपये सहा लक्ष फक्त) इतका निधी वितरीत करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

२. संदर्भाधिन क्र. १ च्या शासन निर्णयातील नियम क्र. १४ मधील तरतुदीनुसार अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य क्रीडा परिषद यांची सदर प्रस्तावास मान्यता घेण्यांत आली असून आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे हे राज्य/राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय स्पर्धेच्या आयोजनाकरिता अनुदान वितरीत करण्यास सक्षम प्राधिकारी आहेत. प्रस्तुत कार्यक्रमाकरिता लेखाधिकारी, क्रीडा व युवक सेवा हे आंहरण व संवितरण अधिकारी व आयुक्त, क्रीडा व युवक सेवा हे नियंत्रक अधिकारी रहातील.

३. प्रस्तुत खर्च सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात"मागणी क्रमांक : ई-३, २२०४ क्रीडा व युवक सेवा-१०३, (२)(३) महाराष्ट्र राज्य क्रीडा परिषदेमार्फत नोंदणीकृत क्रीडा संस्थांना सहायक अनुदान (राज्य) (कार्यक्रम) (२२०४-१९४३) ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर)" या लेखाशिर्षाखाली सुधारीत अंदाजपत्रकान्वये वितरणासाठी उपलब्ध असलेल्या तरतुदीमधून भागविण्यांत यावा.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३२८१७५८५४८६२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Rajendra Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=679184b88f7019ef64ad6ddc2495ca280267c0d4755ce63fa70c45cf755d9373, cn=Rajendra Shankarrao Pawar
Date: 2018.03.28 18:01:09 +05'30'

(राजेंद्र पवार)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. महालेखापाल (लेखा अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१ व २, मुंबई/नागपूर
३. महालेखापाल (लेखा व परीक्षा), महाराष्ट्र-१ व २, मुंबई/नागपूर
४. संबंधित विभागीय उप संचालक, क्रीडा व युवक सेवा (संचालनालयामार्फत)
५. लेखाधिकारी, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे
६. संबंधित वरीष्ठ कोषागार अधिकारी/जिल्हा कोषागार अधिकारी, (संचालनालयामार्फत)
७. संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी, क्रीडा व युवक सेवा (संचालनालयामार्फत)
८. वित्त विभाग (व्यय-५)/ नियोजन विभाग (का. १४७१), मंत्रालय, मुंबई.
९. कार्यासन अर्थसंकल्प, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. निवड नस्ती (क्रीयुसे-३)

परिशिष्ट-अ

सन २०१७-१८ या वर्षासाठी महाराष्ट्र राज्य क्रीडा परिषद योजनेअंतर्गत राज्य/राष्ट्रीय/ आंतरराष्ट्रीय स्पर्धा आयोजनासाठी मान्य झालेल्या प्रस्तावांची यादी.

अ.क्र	संस्थेचे नाव	खेळ बाब	स्पर्धा	रक्कम
१	नारायणा व्यायामशाळा व क्रीडा मंडळ, औरंगाबाद	ॲथलेटिक्स	राज्यस्तर सबज्युनियर ॲथलेटिक्स अजिंक्यपद क्रीडा स्पर्धा २०१३-१४	रु. १,००,०००/-
२	नारायणा व्यायामशाळा व क्रीडा मंडळ, औरंगाबाद	सॉफ्टबॉल	२३ वी राज्य ज्युनियर सॉफ्टबॉल (मुली) अजिंक्यपद स्पर्धा २०१६-१७	रु. ५०,०००/-
३	अकोला जिल्हा वेटलिफ्टिंग असोसिएशन, अकोला.	वेटलिफ्टिंग	६७ वी पुरुष व ३२ वी महिला राज्यस्तरीय वरीष्ठ वेटलिफ्टिंग अजिंक्यपद स्पर्धा २०१६-१७	रु. १,००,०००/-
४	सांगली जिल्हा ॲमॅच्युअर मल्लखांब असोसिएशन, सांगली.	मल्लखांब	६० वी राष्ट्रीय शालेय मल्लखांब क्रीडा स्पर्धा २०१५-१६	रु. २,००,०००/-
५	नॅशनल असो. फॉर द ब्लाईंड युनिट महाराष्ट्र, नाशिक	विविध खेळ	दृष्टीबाधितांच्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धा २०१६-१७	रु. १,००,०००/-
६	नारायणा व्यायामशाळा व क्रीडा मंडळ, औरंगाबाद	सॉफ्टबॉल	२० वी महाराष्ट्र राज्य सबज्युनियर सॉफ्टबॉल (मुले) अजिंक्यपद स्पर्धा २०१५-१६	रु. ५०,०००/-
			एकूण....	**रु. ६,००,०००/-**

Rajendra Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=679184b88f7019ef64ad6ddc2495ca280267c0d4755ce63fa70c45cf755d9373, cn=Rajendra Shankarrao Pawar
Date: 2018.03.28 18:01:20 +05'30'

(राजेंद्र पवार)
शासनाचे उप सचिव